# ग्रामीण संक्रमणाच्या मिथकाचे अर्धसत्य मांडणाऱ्या कथा

## सचिन वसंत पाटील यांच्या कथांची एकत्रित समीक्षा



प्रा. साईनाथ पाचारणे

■ ग्रामीण संक्रमणाच्या मिथकाचे अर्धसत्य मांडणाऱ्या कथा

सचिन वसंत पाटील यांच्या ग्रामीण कथांची एकत्रित समीक्षा

© साईनाथ पाचारणे, राजगुरुनगर, मु. पो. तिन्हेवाडी,

ता. खेड, जि. पुणे. मोबा. ९६२३८६२६४६.

■ प्रकाशक : सप्तर्षी असोसिएटस् अॅन्ड पब्लिकेशन,

अॅड. सौ. कुमुदिनी सि. घुले, शिव कॉर्नर, शॉप नं. १०,

एस. के. टी स्कूल समोर, सेक्टर १५, न्यू पनवेल.

व्यवस्थापक: सय्यद शेख, मोबा. ९८२२७०१६५७.

E-mail : saptarsheeprakashan@gmail.com

■ मुखपृष्ठ : कोंदन प्रिंटसेट मिडिया, सांगली.

■ मुद्रक : भारती मुद्रणालय, कोल्हापूर.

■ प्रथम आवृत्ती : ऑक्टोबर २०२०.

ISBN : 978-93-87939-66-0

■ मूल्य : १५० रुपये.



कोणतीही साहित्यकृती ही लेखकाची वैयक्तिक निर्मिती असली तरी तिला सामाजिक, सांस्कृतिक परंपरांचा आधार असतो. त्यामुळे जरी ती स्वायत्त असली तरी अनेक नात्यांनी व धाग्यांनी समाज जीवनाशी जोडलेली असते. ती व्यक्तिसापेक्ष असूनही तिला वस्तुनिष्ठ अस्तित्व असते. त्यामुळे साहित्यकृतीच्या गुणावगुणांचा शोध घेताना समीक्षकाचाही कस लागतो.

प्रा. साईनाथ पाचारणे, हे नीरक्षीर विवेकी न्यायाने समीक्षा करणारे समीक्षक म्हणून परिचित आहेत. साहित्य प्रकारातील साहित्यकृतींची क्ष-किरण तपासणी करून त्यातील मर्म आणि वर्म शोधण्यात त्यांचा हातखंडा आहे. नव्या पिढीतील कथाकार सचिन वसंत पाटील यांच्या 'अवकाळी विळखा' आणि 'सांगावा' या कथासंग्रहातील कथांची एकत्रित समीक्षा करून त्याचे साक्षेपी मूल्यमापन केले आहे. त्यांच्या कथांचा आस्वाद वाचकांना वेगवेगळ्या दृष्टीने घेता यावा यासाठी कथेच्या अंगभूत घटकांच्या अनुषंगाने ही दीर्घ समीक्षा आली आहे. कथांतील अंतर्भूत सौंदर्यस्थळांचा शोध घेऊन वाचकांपुढे ठेवण्याचे समीक्षकाचे कौशल्य वाखाणण्यासारखे आहे.

सचिन पाटील यांच्या कथांची आस्वादक समीक्षा आपल्याला या ग्रंथात वाचावयास मिळते. सूक्ष्म निरीक्षणशक्ती, संक्रमणाच्या वाटेवरील बदलाची नोंद घेण्याची हातोटी, नव्या-जुन्यातील मूल्य संघर्ष, माती आणि मूल्यांची पाठराखण करण्याची सजग भूमिका यांच्या नोंदी घेत कथांचे संश्लेषण आणि सुसूत्र विश्लेषण 'ग्रामीण मिथकाचे अर्धसत्य मांडणाऱ्या कथा' या समीक्षा ग्रंथात अवलोकनात येते. वास्तविक समीक्षक हा गुणावगुणांची साधक-बाधक मांडणी करीत असतो, नव्हे हे त्याचे कर्तव्यच असते. येथेही तसेच घडले आहे. सचिन पाटील यांच्या दोन्ही कथासंग्रहातील कथांमधून आढळणाऱ्या कथेच्या आंगोपांगाची घुसळण करून त्याचा अर्क या ग्रंथात आलेला आहे. ग्रामीण आणि शेती संस्कृतीतील घटना घडामोडींचा ठाव घेत सचिन पाटील यांच्या कथा मूर्त झालेल्या दिसतात, याचे चिकित्सक विश्लेषण या ग्रंथामध्ये प्रा. साईनाथ पाचारणे यांनी केलेले जाणवते. कधी आस्वादकाच्या भूमिकेतून तर कधी मनोविश्लेषणाच्या माध्यमातून ही समीक्षा आकारात आली आहे.

डॉ. श्रीकांत श्रीपती पाटील,
राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त शिक्षक
राज्य शासन पुरस्कार प्राप्त लेखक.

ISBN 978 93 87939 66 0